Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume - 5 | Issue - 8 | Sept - 2015




# जालना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांतील आरोग्य सेवा-सुविधांची उपलब्धता

**दादासाहेब सुदामराव गजहंस [१] ,शेजवळ संदीप रतनराव [२]**
[१]सहयोगी प्राध्यापक , भूगोल विभाग, मत्स्योदरी महाविद्यालय, जालना .
[२]संशोधक विद्यार्थी,भूगोल विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**प्रस्तावना :**

भारतात लोकशाही स्थापन झाल्यानंतर लोकांच्या सर्वांगीण विकासाच्या अपेक्षा खऱ्या अर्थाने पुढे येण्यास सुरूवात झाली. कल्याणकारी राज्यात शासनाने काही बाबतीत प्राधान्याने लक्ष घालण्यास सुरूवात केली. आज आपणास अन्न, वस्त्र, निवारा याचबरोबर लोकांच्या आरोग्याविषयी नियोजनास प्रारंभ झाल्याचे दिसत आहे. सामाजिक स्वास्थ्य चांगले असल्यास देशाची सर्व विकास कार्ये सुरळीत चालतील म्हणून सर्वांगीण विकास व त्याविषयीचे कार्य राज्यांच्या व देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. या शोध प्रबंधात सार्वजनिक आरोग्याच्या विकास कार्याची माहिती मांडण्यात आली आहे. देशात आठ टक्के वार्षिक वृद्धी दर प्राप्त करण्यासाठी मनुष्याचे राहणीमान देखील उंचावले पाहिजे. यात गरीब वर्गाचा विचार करणे गरजेचे ठरते.

आज भारतात साधारणत: ७०% जनता ग्रामीण भागात वास्तव्य करते. या गरीब जनतेस दिर्घायुषी आणि सुखकर जीवन प्राप्त करून देण्यासाठी काही विशिष्ट क्षेत्र जसे- प्राथमिक आरोग्य सुविधा, प्राथमिक शिक्षा, शेतीविषयक विकास, कुटुंब नियोजन अशी कार्य करणे अगत्याचे ठरते. आरोग्य रक्षण हे लोकप्रशासनाचे प्रमुख कार्य आहे. आरोग्यासाठी गुंतवणूक करणे म्हणजे मानवी संसाधनाच्या विकासात गुंतवणूक करणे, जे राष्ट्रीय विकासास सहाय्यभूत ठरते. आरोग्य सुदृढ करणे आणि जीवनमान उंचावणे म्हणजे आरोग्य विकास होय. पण यासाठी आवश्यक बाब म्हणजे आरोग्य कार्यक्रमाचे नियोजन करावयास हवे. सरकारी यंत्रणा व यात कार्य करणारे कर्मचारी वर्गास या संदर्भात योग्य प्रशिक्षण व जाणीवांची गरज भासते. यासाठी आरोग्यविषयक धोरणांचा आराखडा आणि समग्र रूपरेषा ही आरोग्य संवर्धकविषयक कार्यक्रमास सहाय्यभूत ठरते. आरोग्य नियोजनाच्या यशस्वीतेसाठी अनेक गोष्टी आधारभुत असतात. यात प्रामुख्याने योग्य धोरणाची निवड आवश्यक ठरते. आरोग्यविषयक धोरणाचा अर्थ पाहता आरोग्यविषयक कार्य निश्चित असे उद्दिष्ट समोर ठेवून त्या अनुषंगाने त्यास प्राधान्य देऊन योग्य दिशेने ते कार्यान्वीत करणे होय. सर्वत्र जगभरातील सरकारांनी हे मान्य केले आहे की, आरोग्यावरील गुंतवणूक ही मनुष्य बळाच्या कार्यासाठी उपयुक्त ठरते. हेच सुत्र लक्षात घेतले तर भारतातही अशी गुंतवणुक दिर्घकाळासाठी फायद्याची ठरू शकते.




**अभ्यासक्षेत्र:**


अभ्यासासाठी निवडलेला जालना जिल्हा हा दक्षिण पठाराच्या क्षेत्रात येतो. जालना जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेस जळंगाव, पूर्वेस बुलढाणा व परभणी, दक्षिणेकडे बीड, पश्चिमेस जालना जिल्हा वसलेला आहे.

जिल्ह्याच्या उत्तर भागात सातमाळा व अजिंठा हे डोंगर आहेत. जालना टेकड्यांच्या रांगा या सातमाळा टेकड्याच्या उपरांगा असून त्या पूर्व-पश्चिम पसरलेल्या आहेत.

जालना जिल्ह्याची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची ५३४ मीटर आहे. व जालना जिल्हा १९.१० ते २०.३० या उत्तर अक्षांशावर व ७५.४० ते ७६.४० या पूर्व रेखांशा दरम्यान वसलेला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७७१८ चौ कि. मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत २.५१ टक्के आहे, तर मराठवाडा विभागाच्या ११.९ टक्के आहे जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी १०२ चौ कि. मी. क्षेत्रफळ (१.३२ टक्के) नागरी भागाचे असून उर्वरित ७७१६ चौ. कि. मी. क्षेत्रफळ (९८.६८ टक्के) ग्रामीण भागाचे आहे. २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात एकूण ९६३ गावे आहेत. जिल्ह्यात जालना, अंबड,परतूर आणि भोकरदन या ठिकाणी नागरी क्षेत्र असून त्यासाठी नगरपरिषदा आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १९.५८ लक्ष आहे; जी २००१ च्या जनगणनेनुसार १६.१२ लक्ष एवढी होती. म्हणजेच २००१ च्या तुलनेत २०११ मध्ये जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येत ३.४६ लक्ष इतकी वाढ झाली आहे.

जालना जिल्ह्यातील बहुतांशी जमीन अग्निजन्य खडकापासून बनलेली असून ती काळी, मध्यम, कमी-जास्त खोली असलेली व वेगवेगळ्या प्रतिची आढळून येते. जालना, बदनापूर, भोकरदन व जाफ्राबाद या तहसिल मधील जमीन हलक्या प्रतिची व मुरमाड आहे. या भागात प्रामुख्याने खरिपाची पिके घेतली जातात जिल्ह्यातील दक्षिण व दक्षिण पूर्व भागातील अंबड, घनसावंगी व मंठा या तहसिलमध्ये जमीन काळी व सुपिक आहे.


JALNA DISTRICT
Location Map
India
0 400 KM
Maharashtra
MARATHWADA
JALNA
0 100 KM
JALNA District
BHOKARDAN
JAFRBAD
BADNAPUR
JALNA
MANTHA
AMBAD
GHANSAWANGI
PARTUR
N
0 15 30 KM

## संशोधन पध्दती व उद्दिष्टे (Research Methodology & Objectives):

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्दिष्टे म्हणजे जालना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवासुविधांचा सद्यस्थितीचा अभ्यास करणे, उणिवा शोधणे व त्यावर उपाय सुचविणे. यासाठी सन २०१३-२०१४ च्या सांख्यिकीय आकडेवारीची मदत घेण्यात आली आहे.

सदरील संशोधनासाठी काही उद्दिष्टे ठरविण्यात आली. ती खालीलप्रमाणे -

१) जालना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांतील सेवा-सुविधांचा अभ्यास करणे.

२) प्राथमिक आरोग्य केंद्रातील सुविधा या लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशा आहेत का, हे तपासून पाहणे.

३) जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवा सुविधांसंबंधीच्या अडचणी लक्षात घेणे.

### अभ्यास विषय :

जालना जिल्ह्यातील शासकीय आरोग्य सेवा सुविधांच्या सद्यस्थितीचा अभ्यास केला असता जिल्ह्यात खालील प्रकारच्या आरोग्य सेवा सुविधा आढळून आल्या आहेत.

**तक्ता क्र. १**

**जालना जिल्ह्यातील शासकीय आरोग्य सुविधांची उपलब्धता**

| अ. क्र. | विवरण | संख्या |
|---|---|---|
| १ | जिल्हा शासकीय रुग्णालय | १ |
| २ | उपजिल्हा रुग्णालये | ८ |
| ३ | जिल्हा स्त्री रुग्णालये | १ |
| ४ | प्राथमिक आरोग्य केंद्रे | ४० |
| ५ | ट्रामा केअर रुग्णालय | १ |
| ६ | प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे | २१३ |

स्रोत: आरोग्य विभाग, जि.प. जालना

तक्ता क्र. १ असे दर्शवितो की, जालना जिल्ह्यामध्ये १ जिल्हा सामान्य शासकीय रुग्णालय असून ते जालना येथे स्थित आहे. याशिवाय जिल्ह्यात एकुण ८ उपजिल्हा रुग्णालये आहेत जी तालुकाच्या ठिकाणी कार्यरत आहेत. याशिवाय जिल्हा शासकीय रुग्णालयाचे विस्तारीकरण नव्या ठिकाणी झाल्याने जालना येथील जुन्या शासकीय रुग्णालयाचे रुपांतर जिल्हा स्त्री रुग्णालयात करण्यात आले आहे.

### जालना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपलब्ध सेवा सुविधा :

जिल्ह्यातील एकूण ४० प्राथमिक आरोग्य केंद्रामधून खालील प्रकारच्या सेवा सुविधा आढळून आलेल्या आहेत.

**तक्ता क्र. २**

**जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील उपलब्ध सेवा सुविधा**

| अ. क्र. | सेवा सुविधा | प्राथमिक आरोग्य केंद्रातील सेवांची उपलब्धता | |
|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी |
| १ | शस्त्रक्रिया विभाग (ऑपरेशन थियटर) | २६ | ६५ |
| २ | अतिदक्षता विभाग (आय.सी.यु.) | २ | ०५ |
| ३ | रक्तपेढी | ४ | १० |
| ४ | एच.आय.व्ही.तपासणी | ८ | २० |
| ५ | थुंकी तपासणी | १६ | ४० |
| ६ | मोती बिंदू शस्त्रक्रिया | ४ | १० |
| ७ | कुटुंब कल्याण कार्यक्रम | ४० | १०० |
| ८ | प्रसुती सेवा | ४० | १०० |
| ९ | ट्रीपल डोस | ४० | १०० |
| १० | रूग्ण वाहिका | २८ | ७० |

स्त्रोत: आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जालना

### शस्त्रक्रिया विभाग (ऑपरेशन थेअटर ):

जिल्ह्यातील २६ (६५ टक्के) प्राथमिक केंद्रातून ऑपरेशन थिअटरचा सेवा उपलब्ध आहेत, परंतु त्याचा दर्जा हा खाजगी रुग्णालयासारखा किंवा शहरी भागातील दवाखान्यासारखा नाही. जागा कमी, अस्वच्छता अशा बाबी पाहवयास मिळाल्या, ऑपरेशन विभागातील फर्निचर जूने आहे. नवीन व अद्ययावत सुविधा उपलब्ध नाही.

### अतिदक्षता विभाग (आय.सी.यु ):

जिल्ह्यातील एकूण प्राथमिक आरोग्य केंद्रातील आ.सी.यु. (आपत्कालीन दक्षता विभाग) फक्त २ (५ टक्के) केंद्रातून पाहावयास मिळाली. म्हणजेच ग्रामीण भागात अतिदक्षता विभाग प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध नाही. तेव्हा अशा परिस्थितीत रुग्णाला जिल्ह्यातील दवाख्यान्यात किंवा खाजगी रुग्णालयात न्यावे लागते.

### रक्तपेढी :

रक्तपेढी ही एक जीवनदायी आरोग्य सुविधा आहे. जालना जिल्ह्यातील फक्त ४ (१०%) प्राथमिक आरोग्य केंद्रातून ही सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रूग्णास ताबडतोब रक्त द्यावयाचे असल्यास अडचणी येतात. शहरातील जिल्ह्याच्या ठिकाणाहून रक्त पुरवठा करावा लागतो. त्यामुळे बराच वेळ निघून जातो. अशा वेळेस रूग्णाच्या जीवीतास ते धोकादायक ठरू शकते.

### एच.आय.व्ही. तपासणी :

ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातून ८ (२०%) केंद्रात एड्स रक्त तपासणी सेवा उपलब्ध आहे. भारतातील व महाराष्ट्रातील वाढती एच.आय.व्ही. ग्रस्त रुग्णांची संख्या बघता प्रत्येक केंद्रात ही व्यवस्था आवश्यक झाली आहे.

**थुंकी तपासणी :**

रूग्णाची थुंकी तपासणी ही रोग निदानासाठी आवश्यक ठरते. जालना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील १६ (४०%) केंद्रावर ही सुविधा उपलब्ध आहे.

**मोतीबिंदू शस्त्रक्रिया :**

डोळयांच्या आजारामध्ये मोतीबिंदू झाल्यावर रूग्णाची नजर कमी होते व कालांतराने दृष्टी नाहीसी होते. अशा परिस्थितीत मोती बिंदूची शास्त्रक्रिया करावी लागते, तशी ही शस्त्रक्रिया कमी वेळात व कमी खर्चात होते. यात फारशी-सुविधा लागत नाही. तरीही जालना जिल्ह्यातील फक्त ४ (१०%) प्राथमिक आरोग्य केंद्रात ही सुविधा उपलब्ध आहे.

**कुटुंब कल्याण/प्रसुती सेवा :**

कुटुंब कल्याण ऑपरेशन (शस्त्रक्रिया) सुविधा जिल्ह्यातील सर्वच्या १०० टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध आहे. परंतु कुटुंब कल्याण कार्यक्रमाकडे गांभीर्याने लक्ष दिल्या जात नाही.

**ट्रिपलडोस बालसंगोपन :**

बाल संगोपन व त्रिगुणी लक्ष हा कार्यक्रम जिल्ह्यातील सर्वच प्राथमिक आरोग्य केंद्रातून राबविला जातो.

**रूग्णवाहिका :**

रूग्णवाहिका (ॲब्युलन्स) ही आरोग्य सेवामधील अतिशय महत्वाची सेवा आहे. त्यामुळे आपत्कालीन वेळेवर रूग्णास तात्काळ आवश्यक त्या ठिकाणी हलविण्यात येते; अशी सेवा ही सर्वच केंद्रात आवश्यक आहे. जिल्ह्यातील ७० टक्के केंद्रातच ही सुविधा आहे.

**निष्कर्ष, अडचणी व सूचना:**

जालना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य सेवा सुविधांचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, जिल्ह्याच्या एकुण लोकसंख्येच्या तुलनेत जिल्ह्यातील उपलब्ध प्राथमिक आरोग्य केंद्रातील सोयी सुविधा अपुऱ्या स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे खाजगी आरोग्य सुविधांवरच लोकांना अवलंबून रहावे लागते. याशिवाय उपलब्ध शासकीय सुविधांची गुणवत्ताही खालावलेली दिसते. त्यातील कर्मचारी, उपकरणे, योजना या सर्व बाबींची अंमलबजावणी व्यवस्थित होत नाही. सामान्य जनतेला आर्थिकदृष्ट्या खाजगी आरोग्य सोयी सुविधा परवडत नाही. त्यामुळे त्यांना दर्जेदार शासकीय आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे हे शासनाचे कर्तव्य असून या दृष्टीने शासनाने यामध्ये गांभीर्याने लक्ष देणे अपेक्षित आहे.

**संदर्भ :**

१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जालना जिल्हा २०११
२) डॉ. वैद्य, आयुर्वेदाचा इतिहास, साधना प्रकाशन, मुंबई
३) यशवन्त रामकृष्ण दाते : सुलभ विश्वकोष भाग १ ला, प्रसाद प्रकाशन, पुणे